// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

**अत्यंत महत्वाचे**
**कालमर्यादा**

क्रमांक:- ममआ-२०१८/कार्यशाळा-समु/का-०३/१३१
दिनांक:- ११.०२.२०१९

प्रति,
सेवाभावी संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ,

विषय:- कार्यशाळा/शिबिर/चर्चासत्र यांचे अहवाल सादर करण्याबाबत.
संदर्भ:- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची दि.२९.०५.२०१८ रोजीची जाहीरात.

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीनुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सामाजिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठ, यांचेकडून महिलांच्या विविध विषयांवर कार्यशाळा घेण्यासाठी अनुदान देण्यात आले होते. त्यापैकी कार्यशाळा /चर्चासत्र यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी ५०% अग्रीम अनुदान आयोगामार्फत वितरित करण्यात आले होते.

उर्वरित ५०% अनुदान घेण्याकरीता आपण महिला आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कार्यशाळा/चर्चासत्र यावर कार्यवाही करुन केलेल्या संपूर्ण दस्ताऐवजांच्या लेखा विषयक बाबींसहीत दि.२९.०१.२०१९ पर्यंत महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई येथे प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु अद्यापही आपण संपूर्ण दस्ताऐवज आयोग कार्यालयास सादर केले नाहीत.

तरी तुम्हाला अंतिम तारीख २८ फेब्रुवारी,२०१९ ही देण्यात येत आहे. जर आपण आपले उपयोगिता प्रमाणपत्र व इतर दस्ताऐवज आयोग कार्यालयास सादर केले नाहीत, तर आपणास काळया यादी (Black list) मध्ये समाविष्ट करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मा. अध्यक्षांच्या निर्देशाने**

(डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव